महाराष्ट्र शासन

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अमरावती**

ई-मेल:-**gmcamravati@gmail.com**

---

जा.क्र.शावैमहाअ/बांधकाम / 369 /२६ दि. ०४.०२.२०२६

# किरकोळ विद्युत उपकरणे खरेदी करिता
# जाहिर ई-दरपत्रक सूचना

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती करिता या संस्थेत एलईडी सिलींग लाईट, लाईटचे चोक, फॅन, रेगुलेटर साहित्य पुरवठादार नियुक्त करण्याकरिता व त्यांचे दर १८० दिवसाच्या कालावधी करिता दर निश्चित करुन ठेवण्याकरिता इच्छुक पुरवठादारांकडुन एकल दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर कालावधी दरनिश्चिती पत्र निघाल्याच्या दिवसापासुन १८० दिवसांकरिता राहील.

दरपत्रक अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांचे नावे सादर करावयाचे असुन दरपत्रकाच्या लिफाफ्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकरिता आवश्यक असलेल्या किरकोळ विद्युत उपकरणे खरेदी करिता दरपत्रक असे स्पष्ट नमुद करण्यात यावे. स्वत:चे नाव व पत्ता लिहावा अशा प्रकारे तयार करण्यात आलेले दरपत्रक दि.11/02/२०२६ रोजी सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत कार्यालयात आणून देण्यात यावे.

प्रापत होणाऱ्या दरपत्रकातील लिफाफे दि. 12/ 02/ २०२६ रोजी दु. १२:०० वाजता अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांच्या दालणामध्ये उघडण्यात येईल. इच्छुक पुरवठादारास सदर सभेस उपस्थित राहता येईल.

जिथे दर द्यावयाचे नाही तिथे इच्छुक नाही असे स्पष्ट नमुद करावे. ती जागा रिकामी सोडण्यात येवू नये. सर्व दर हे एका नगाकरिता सर्व कर समाविष्ट करुन नमुद करावे. अपुर्ण माहितीसह प्राप्त होणारी दरपत्रक नाकारण्याचा अधिकारी अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे. तसेच यादी मधील काही बाबी किंवा मागविण्यात येणाऱ्या संपुर्ण दरपत्रकाची प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकारी अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे.

दर हे पेनने लिहीन्यात येऊ नये ते प्रिंट केलेले असावे. हस्ताक्षरात लिहिलेले दरपत्रक रद्द करण्यात येईल. दरनिश्चिती झाल्यावर आवश्यकतेनुसार वेळोवेळी आदेश काढण्यात येईल. आदेश प्राप्त होताच १० दिवसांत आदेशातील काम करणे बंधनकारक राहील. न्युनतम ठरणाऱ्या पुरवठादारास नमुद विनिदिष्टांप्रमाणे सदर काम करणे बंधनकारक राहील.

लिफाफ्यामध्ये आवश्यक कागदपत्रे जसे की, दुकान नोंदणी प्रमाणपत्र (Shop Act), जीएसटी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, आधार कार्ड, उद्यम प्रमाणपत्र यांच्या छायांकित प्रती असणे अनिवार्य राहील. नसल्यास आपले दरपत्रक रद्द समजण्यात येईल.

सदर दरपत्रकासंबधी आपणास काही तक्रार या कार्यालयास दाखल करावयाची असल्यास प्रथम आपण या कार्यालयात तक्रार संबधी रु. १०,०००/- शासन खाती जमा करावे लागेल. जर आपण दाखल केलैल्या तक्रारीत या कार्यालयास काही तथ्य आढळून आल्यास आपणास आपण शासन खाती जमा केलेली रु. १०,०००/- रक्कम परत करण्यात येईल. तक्रारीमध्ये काही तथ्य न आढळल्यास रु. १०,०००/- रक्कम परत करता येणार नाही व ती रक्कम शासन खाती जमा करण्यात येईल.

4-2-2026

( डॉ.एन.जी.राऊत )
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती

## किरकोळ विद्‌युत साहित्य खरेदी करिता साहित्याची यादी

| अ.क्र. | वस्तूचे नाव | प्रतिनग | दर (जीएसटी सह) |
|---|---|---|---|
| 1 | Square LED Downlight/Slim Panel Light/ Recessed LED Panel Size 12 W, Dimensions 4X4 inches | 1 | |
| 2 | LED Light Choke (LED Driver) | 1 | |
| 3 | Celing Fan 33 W Silent Motor | 1 | |
| 4 | Wall Fan 400mm | 1 | |
| 5 | Celing Fan Regulator | 1 | |

N Raut 4-2-26

( डॉ.एन.जी.राऊत )
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती